महाराष्ट्र शासन
उद्योग संचालनालय
कार्यालय, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना
Email : didic.jalna@maharashtra.gov.in Tele : ०२४८२-२२०९५७, २२०९८५

दिनांक :- ०३/०९/२०२१

# जिल्हा निर्यात प्रचलन समिती,जालना

## सभेचे इतिवृत्त

जिल्हा निर्यात प्रचलन समितीची सभा दिनांक ०३/०९/२०२१ रोजी मा. जिल्हाधिकारी, जालना यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय येथे संपन्न झाली. सभेस खालील प्रमाणे अधिकारी / समिती सदस्य उपस्थिती होते.

| अ.क्र. | नांव | पदनाम | कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | श्री.डॉ. विजय राठोड भाप्रसे | मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष | जिल्हाधिकारी कार्यालय जालना |
| २ | श्री.प्रविण नलावडे | उपाध्यक्ष, | उप संचालक, विदेश व्यापार महानिदेशालय, पुणे |
| ३ | श्री.एस.सी.श्रीवास्तव | सदस्य | राज्य कर उपायुक्त, वस्तु व सेवा कर कार्यालय जालना |
| ४ | श्री. के.व्हि.खरात | महाव्यवस्थापक तथा सचिव | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र जालना |
| ५ | श्री.सुभाष इंगेवार | सदस्य | उप संचालक, सुक्ष्म लघु व मध्येम उपक्रम औरंगाबाद |
| ६ | श्री.मोघे | सदस्य | जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक, जालना |
| ७ | श्री.तेजल क्षिरसागर | सदस्य | महाप्रबंधक नाबार्ड जालना |
| ८ | श्री.नरेंद्र इस्टोलकर | संयुक्त निदेशक | एमएसएमई डीआय औरंगाबाद |
| ९ | श्री.एस.आर.बोर्डे | क्षेत्रव्यवस्थापक | प्रादेशिक कार्यालय एमआयडीसी औरंगाबाद. |
| १० | श्री.सुनिल रायठठ्टा | सदस्य | स्टील असोसिएशन प्रतिनिधी |
| ११ | श्री.नितिन काबरा | सदस्य | स्टील असोसिएशन प्रतिनिधी |
| १२ | श्री.अक्षय घेई | सदस्य | दि.जालना इंडरप्रिन्युअर्स असोसिएशन जालना |
| १३ | श्री.जितेंद्र राठी | सदस्य | लघु उद्योग भारती जालना |
| १४ | श्री.डॉ. नंदकुमार कुंचगे | निमंत्रीत सदस्य | संचालक, कलश सिड जालना |
| १५ | श्री.अरुण के.नादरे | सह.व्यवस्थापक | एमएसएएमबी औरंगाबाद (APEDA) |
| १६ | श्री.जी वैद्यनाथन,<br>श्री.व्ही.जी.घरत,<br>श्री. आर.बी.जोशी, | जेएनपीटी वरिष्ठ अधिकारी | प्रबंधक पत्तन नियोजन एवं विकास विभाग, जवाहरलाल नेहरू पोर्ट, नवी मुंबई. |

सभेच्या सुरुवातीस महाव्यवस्थापक तथा सचिव यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेस सुरुवात केली. महाव्यवस्थापक यांनी सभेस झुमद्वारे ऑनलाईन उपस्थित असलेले श्री.प्रविन नलावडे उपाध्यक्ष तथा संचालक DGFT पुणे यांना सुदर समितीची स्थापना करण्या मागचे उदिष्ट व पार्श्वभुमी विशद करण्या बाबत विनंती केली.

श्री.प्रविन नलावडे उपाध्यक्ष तथा संचालक DGFT पुणे यांनी महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा व कामगार विभागामार्फत दिनांक १९ ऑक्टोबर २०२० रोजी निर्गमित झालेल्या शासन निर्णयानुसार सदर समिती गठित करण्यांत आली असून जिल्हयातील निर्यात वाढीसाठी विविध केंद्रे व जिल्हा कार्यालय, औद्योगिक संघटना, निर्यात परिषदा, निर्यात सल्लगार इ. यांच्याशी सातत्याने पाठपुरावा,समन्वय व अडीअडचणी दुर करणे हा या समितीचा मुळ उदेश आहे तसेच वाणिज्य व उद्योग मंत्रालय, भारत सरकार व राज्य शासन यांच्यामध्ये समन्वय साधून जिल्हयांना निर्यात केंद्र बनविण्यासाठी प्रयत्न करणे, जिल्हयांना निर्यात केंद्र म्हणून विकसित करुन निर्यात वृध्दीसाठी प्रयत्न करणे, निर्यातीसाठी नविन क्षेत्राची निवड करणे व जिल्हयातील पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी आडथळे ओळखून निर्यातीसाठी पुरक धोरण राबविणे हे समितीचे कार्यआहे असे सांगितले.

महाव्यवस्थापक तथा सचिव यांनी जिल्हयातील निर्यात आराखडा तयार करण्या करिता सहाय्य म्हणून EY कंन्सलटंन्सी, पुणे यांची महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाकडून नेमणूक करण्यांत आली असून सदर संस्थेच्या वतीने श्री.सुदिप मिटकरी हे झुम्द्वारे सभेस ऑनलाईन उपस्थित आहेत त्यांनी निर्याती करिता निर्यात दारांना प्रोत्साहन मिळण्याच्या दुष्टीकोणातुन महाराष्ट्र राज्याच्या निर्यात प्रचलनासाठी काय सुविधा आहेत या बाबत माहिती देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

श्री.सुदिप मिटकारी, EY कंन्सलटंन्सी, पुणे यांनी निर्यातदारा करीता सर्व माहिती एकाच ठिकाणी मिळण्याच्या दुष्टीकोणातून वेब पोर्टल फॉर एक्सपोर्ट तयार करण्याचे काम प्रगती पथावर असून यामध्ये निर्यातदारा करीता केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजना, सद्यस्थितीत व्यापारात असलेली प्रचलीत माहिती, इव्हेन्टस अँड वर्कशॉप, मिडियाँ गॅलरी, इ कॉमर्स, उत्पादना करिता प्रोत्साहन व MEPC, DEPC समितीचे कार्य इत्यादी माहिती पोर्टलवर मिळेल असे सांगितले. तसेच निर्यातदारा करीता data intelligence dashboard तयार करण्यांत येत असून यावर सर्व निर्यातीची माहिती उपलब्ध राहील. निर्यात करणारे व इतर सुक्ष्म लघु उद्योजकांना निर्याती बाबत असलेली प्रक्रिया,गुणवत्तेबाबत माहिती, आयातदारांची निवड व इतर कर, अनुदाने या करिता एक्सपोर्ट गाईडची सुविधा देण्यात येत आहे.

मा. विकास आयुक्त (उद्योग ) तथा निर्यात आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दिनांक १९ ऑगस्ट २०२१ च्या सभेच्या सुचने नुसार पुढील आठवडयात दिनांक २१ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर या कालावधीत निर्यात आठवडा म्हणून साजरा करावयाचा असून या आठवडयामध्ये जिल्हा निर्यात प्रचलन समितीच्या दोन सभा घेणे, जिल्हयातील महाव्यवस्थापकांनी जिल्हयाचा जिल्हा निर्यात आराखडा तयार करणे तसेच इतर निर्यातक्षम उत्पादनांची माहिती घेणे हे या कालावधीत करावयाचे आहे असे महाव्यवस्थापक तथा सचिव यांनी सांगितले.

या नंतर मा. अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, यांनी ज्या निर्यातदारा करिता सदर सभेचे आयोजन आहे व उद्योग विभागाकडून जो मसुदा आराखडा तयार करण्यात आला आहे, त्यामध्ये अजून काही मते व अडीअडचणी असल्यास त्या या सभेस उपस्थित असलेल्या निर्यातदार सदस्यांनी नमुद कराव्या असे सांगितले.

त्यानुसार खालील मुद्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

| अ.क्र. | डीईपीसी सदस्यांचे नांव व मुद्दे | विवरण | संबंधीत विभाग |
|---|---|---|---|
| १ | श्री.सुनिल रायठ्ठा, सदस्य, दि जालना इंड एंटरप्रिन्यअर्स असो.जालना | | |
| | १.ड्रायपोर्ट चे काम प्राधान्याने होने बाबत | श्री.जी वैद्यनाथन, मुख्य व्यवस्थापक PPD श्री.व्ही.जी.घरत, व्यवस्थापक PPD, श्री. आर.बी.जोशी, सहायक व्यवस्थापक, ड्रायपोर्ट मुंबई हे गुगल द्वारे सभेस उपस्थित होते. त्यांनी ड्रायपोर्ट जालनाच्या सद्यस्थितीच्या अनुषंगाने सादरीकरण केले, ड्रायपोर्टचे काम बऱ्याच प्रमाणात प्रगतीपथावर असून पहिल्या टप्प्यातील काम माहे नोव्हेंबर-२०२२ पर्यंत पुर्ण होईल असे सांगितले. | जेएनपीटी, नवी मुंबई |
| | २.ड्रायपोर्ट करीता शेंद्रा डीएमआयसीला ६ पदरी हायवेने जोडणे बाबत | शेंद्रा एमआयडीसी मध्ये निर्यातक्षम असे बरेचसे उद्योग स्थापित होणे प्रस्तावित आहे. त्यामुळे जालना ड्रायपोर्ट ते शेंद्रा डीएमआयसी हे अंतर सहा पदरी हायवेने जोडण्यात यावे. | महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई |

| | | | |
|---|---|---|---|
| | ३. जिल्हयात कमीत एका बॅकेंच्या शाखेकडे विदेशी चलन बाबतची सुविधा असणे बाबत | जालना जिल्हयात निर्यात करीत असतांना विदेशी चलन परिवर्तीत करण्याकरीता औरंगाबाद येथे सुविधा आहे. सदर सुविधा जालना शहरात कोणत्याही बॅकेंच्या एका शाखेकडे उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता आरबीआय यांचे कडे प्रस्ताव सादर करावा. | जिल्हा अग्रणी व्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र, जालना. |
| | ४.निर्यातक्षम परिषद यांना रोड शो करीता आवाहन करणे बाबत | जिल्हयातील काही उत्पादने हे निर्यातगृहाकडून कडून निर्यात केली जाते. तसेच बऱ्याच प्रमाणात उत्पादन आधारीत निर्यात परिषदा कार्यरत आहेत. या सर्वांची निर्यातदार व उद्योग घटकांना माहिती नाही. करीता जिल्हास्तरावर निर्यात परिषद यांना आंमंत्रित करुन रोड शो/कार्यशाळा घेतल्यास निर्यातक्षम उत्पादनात वाढ होईल. | विभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य पणन महासंघ, औरंगाबाद. |
| | ५.आयात/निर्यात बाबत रिफ्रेश कोर्सची सुविधा होणे बाबत | आयात/निर्यातीकरीता बऱ्याच प्रमाणात कागदपत्रे तसेच माहिती/परवाने आवश्यक असतात. याबाबत निर्यातदार अनभिज्ञ आहेत. त्याकरीता आयात/निर्यात बाबत रिफ्रेश कोर्सची सुविधा जिल्हयातील महाविद्यालयात उपल्बध होणे आवश्यक आहे. | सहायक आयुक्त, रोजगार, उद्योजकता व स्वंयरोजगार प्रशिक्षण कार्यालय, जालना. |
| | श्री.नितीन काबरा, सदस्य, स्टील असोसिएशन जालना | | |
| | १.निर्यातक्षम उत्पादने ही व्यापारी/एक्सपोर्ट हब द्वारे केले जातात. | जिल्हयातील निर्यातक्षम उत्पादने ही प्रत्यक्षात निर्यातदारांकडून निर्यात न करता व्यापारी/निर्यातगृहाद्वारे केली जातात. तेव्हा सदरील व्यापारी/ निर्यातगृहाचे कार्यालय जिल्हा मुख्यालय स्तरावर उघडण्यात यावे. याबाबत कार्यवाही करावी. | डीजीएफटी पुणे |
| | २.एमआयडीसीने नवीन औद्योगिक क्षेत्र ड्रायपोर्ट जवळ विकसीत करावे | सद्यस्थीतीत उद्योग/निर्यातदारांकरीता उद्योग उभारणीसाठी भुखंड मुबलक प्रमाणात उपलब्ध नाहीत, तरी नवीन औद्योगिक क्षेत्रात वाढ करावी व शक्यतो ड्रायपोर्ट जवळ विकसीत करावे. | प्रादेशिक अधिकारी, विभागीय कार्यालय, मऔविमं, औंरंगाबाद |
| | ३.एक जिल्हा एक उत्पादन (ODOP) या योजने अंतर्गत स्टील व तत्सम उत्पादनांचा समावेश व्हावा. | जालना जिल्हयात स्टील व संलग्न उत्पादने मोठ्या प्रमाणात तयार होवून निर्यात होत असतात. या मध्ये दोन हजार कोटींपर्यंत कमी कालावधीत निर्यात केल्या जाऊ शकते. तसेच पाच ते दहा वर्षांत हीच निर्यात १० हजार करोडपर्यंत जाऊ शकते. | डीजीएफटी पुणे |
| | ४.कोल्ड स्टोरेज सुविधा उपलब्ध करणे बाबत | जालना जिल्हयात विविध शेतीपुरक उत्पादने निर्यात केली जातात. परंतु सदर उत्पादने ही नाशवंत असल्याने यास कोल्ड स्टोरेजची सुविधा ड्रायपोर्टमध्ये असणे आवश्यक आहे. जेणे करुन निर्यातदारांना फायदेशीर ठरेल. | जेएनपीटी मुंबई. |
| | ५.जिल्हयातील निर्यातक्षम उत्पादनानुसार सांख्यिकीय माहिती/यादी उपलब्ध व्हावी. | निर्यातदारांना जिल्हयातील निर्यातक्षम उत्पादने व किती उद्योग घटक निर्यात करतात यांची माहिती एकत्रित नाही. तसेच सदर माहिती निर्यात आराखडयात समाविष्ट करावयाची आहे. यावर सभेस उपस्थित असलेले श्री.एस.सी.श्रीवास्तव, राज्यकर उपायुक्त यांनी जालना जिल्हयातील निर्यात ही निर्यातगृह/व्यापारी यांचे मार्फत होत असल्याने त्याची नोंद होत नाही, परंतु वस्तु व सेवा कर कार्यालयामार्फत झालेल्या निर्यातीची माहिती देण्यात येईल असे सांगितले. | वस्तु व सेवा कर कार्यालय, जालना |

वरील प्रमाणे सर्व मुद्यांवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर मा.अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांनी उद्योग घटकांनी जिल्हा निर्यात आराखडामध्ये नमुद केलेल्या उत्पादना व्यतिरीक्त अजुन उत्पादने असल्यास किंवा जिल्हयातील निर्यातक्षम उत्पादने जी आहे त्यांची माहिती द्यावी. जेणेकरुन अंतिम निर्यात आराखडा शासनास सादर करणे सोईचे होईल.

महाव्यवस्थापक तथा सचिव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानुन मा.अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

महाव्यवस्थापक तथा सचिव,
जिल्हा निर्यात प्रचलन समिती,
जिल्हा उद्योग केंद्र, जालना

मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा निर्यात प्रचलन समिती, जालना